दै. गोदातीर दि. 09-01-2025

# खाकीवर्दी हेल्मेट मोटारसायकल रॅली राज्य रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत हेल्मेट मोटारसायकल रॅली संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– दि. १ जानेवारी ते ३१ या कालावधीत परिवहन विभागामार्फत राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. यात परवाह काळजी ही थीम घोषीत करण्यात आली आहे. याअभियानाअंतर्गत हेल्मेट मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोटारसायकल रॅलीला हिरवा झेंडा अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी दाखवून उद्घाटन केले.

या रॅलीचे आयोजन हे मोदी मैदान कौठा, नांदेड येथून सुरुवात होऊन रॅलीचा समारोप फरांदे मोटर्स छत्रपती चौक, नांदेड येथे झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष विनय अहिरे हे होते.

हेल्मेट मोटार सायकल रॅलीच्यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संदिप निमसे, उपविभागीय अधिकारी सुशिल कुमार नाईक, सहायक प्रादेशिक समीर शेख, परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज यांची प्रमुख उपस्थिती होती.

रॅलीच्या उद्घाटनाप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी या हेल्मेट मोटारसायकल रॅलीचे प्रमुख आकर्षण हे खाकीवर्दी हेल्मेट मोटारसायकल रॅली हे असल्याचे सांगितले. एक गणवेश धारी अधिकारी कर्मचारी यांनी हेल्मेटसह मोटार सायकल चालविली असल्यामुळे त्यामुळे हजारो नागरिक प्रेरणा घेतील यामुळे या रॅलीचे हे प्रमुख आकर्षण असल्याचे सांगितले. तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे यांनी समारोपाच्या वेळी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यामध्ये त्यांनी मोटारसायकल चालविताना प्रत्येक दुचाकी चालकाने हेल्मेट परिधान केले पाहिजे असे ते म्हणाले. हेल्मेट परिधान केल्याने वाहनचालक स्वतः सुरक्षित राहतो व अपघातापासून वाचल्या जाऊ शकते. मागील वर्षांतील अपघाताचे विश्लेषण केले असता यामध्ये मोटारसायकल चालकांचे सर्वात जास्त अपघात झालेले असून त्यामध्ये हेल्मेट परिधान न केल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या जास्त आहे, असेही त्यांनी सांगितले.

मोटारसायकल रॅली यशस्वी करण्याकरिता वायुवेग पथकातील व इंटरसेप्टर पथकातील मोटार वाहन निरीक्षक राघवेंद्र पाटील, गणेश तपकीरे, सहायक मोटार वाहन निरीक्षक तेजस्विनी कलाले, धीरज गवळी, विशाल बटुळे, अनिकेत गुजांळ, मुख्य लिपीक राजेश गाजुलवाड, वरिष्ठ लिपिक गजानन पवळे व कार्यालयातील सर्व लिपीक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.